

# इतिहास - लेख-८

**कविता मसुरकर, शाळा :** इ.ए.सो. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,
मला खात्री आहे, यापूर्वी झालेल्या पाठांतील प्रश्नोत्तरे तुम्ही नक्की लिहिली असतील. असाच नियमित अभ्यास करा. आज आपण प्रकरण सातमधील आशय थोडक्यात पाहू आणि स्वाध्याय सोडवू.

**७. युरोपात हुकूमशाहीचा उदय**

पहिल्या महायुद्धानंतर युरोपात निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींमुळेच अनेक देशांत हुकूमशाही शासन पद्धतीचा उगम झाला. हुकुमशहांच्या अतिरेकी राष्ट्रवाद आणि आक्रमक लष्करवादामुळेच दुसरे महायुद्ध उद्‌भवले.

**हुकूमशाहीच्या उदयाची कारणे :** १) पहिल्या महायुद्धानंतर देशात निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी, शांतता करारांनी जीत राष्ट्रांवर लादलेल्या अपमानकारक अटी, काही राष्ट्रांच्या आशा-अपेक्षांचा भंग यामुळे जनतेमुळे असंतोष. २) राष्ट्रसंघाकडून न्याय व संरक्षणाबाबत अपेक्षाभंग. ३) देशातील समस्या एककेंद्री शासन व लष्करी सामर्थ्याच्या बळावर सोडविता येतील असा लोकांचा समज यामुळे अनेक देशांत लोकशाही सरकार कोलमडू लागले. इटली, जर्मनी, स्पेन या राष्ट्रांमध्ये हुकूमशाही सत्ता निर्माण झाल्या.

**इटलीतील फॅसिझमचा उदय :** जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्या ताब्यातील इटालियन भाषकांचा प्रदेश मिळविण्याच्या अपेक्षेने, पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढणाऱ्या इटलीचा शांतता करारांनी अपेक्षाभंग झाला. युद्धकाळातील कर्ज, डबघाईला आलेले उद्योग, व्यापार, वाढती बेकारी यांमुळे जनतेत निर्माण झालेला असंतोष संप व उठावाच्या रूपाने बाहेर पडू लागला. या समस्या सोडविणे लोकशाही सरकारला जमले नाही. या परिस्थितीत जनतेला भरघोस आश्वासने देणाऱ्या फॅसिस्ट पक्षाने सन १९२२ मध्ये इटलीची सत्ता काबीज केली. शिक्षक व पत्रकार असणाऱ्या बेनिटो मुसोलिनीने सन १९१९ मध्ये फॅसिस्ट पक्ष स्थापन केला होता.

**मुसोलिनीचा फॅसिस्टवाद :** १) आत्यंतिक राष्ट्रवाद, इटलीच्या उज्ज्वल भविष्यावरील निष्ठा, साम्यवादाला विरोध ही मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षाची विचारप्रणाली, २) शिस्तबद्ध संघटना, ३) तरुण स्वयंसेवकांची सशस्त्र पथके, ४) पक्षाचे बोधचिन्ह- काठ्यांच्या जुडग्यात असलेली कुऱ्हाड, ५) उद्दिष्टे- इटलीचा प्रदेशविस्तार, आर्थिक सुधारणा, खासगी मालमत्तेचे रक्षण, शेतकरी व कामगारवर्गाना मदत, जनतेत राष्ट्रनिष्ठा बिंबविणे इ.

**फॅसिस्ट सत्तेखालील इटली :** सत्तेवर येताच मुसोलिनीने राजाला नामधारी बनवून सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित केली. विरोधकांचा नायनाट केला. वृत्तपत्रांवर निर्बंध लादले. कामगार संघटना दडपल्या. त्याचबरोबर आर्थिक विकास, औद्योगिक विकास करून जनतेचे राहणीमान सुधारले. शिक्षणाद्वारे फॅसिस्ट विचारसरणी तरुणांवर बिंबवली. इतिहासाचे गौरवीकरण केले.

**विस्तारवादी भूमिका :** जनतेचे समर्थन आपल्या धोरणांना मिळवून आक्रमक विस्तारवादी भूमिका स्वीकारली. तुर्कस्तानकडून एजियन समुद्रातील बेटे घेऊन नाविक तळ उभारला. फ्यूम बंदर (१९२४) व आफ्रिका खंडातील इथिओपिया देश (१९३६) बळकावला. अशा प्रकारे फॅसिस्ट इटली आक्रमक राष्ट्र बनले.

**जर्मनीत नाझीवादाचा उदय :** पहिल्या महायुद्धानंतर जर्मन सम्राटाने राज्यत्याग करताच जर्मनीत 'वायमर प्रजासत्ताक' स्थापन करण्यात आले. या सरकारने जर्मनीवर लादलेला अपमानकारक व्हर्साय तह लादल्यामुळे तेथील जनता व लष्कर या सरकारच्या विरोधात होते. देशाची डबघाईला आलेली अर्थव्यवस्था, जनतेवर वाढलेले करांचे ओझे आणि अपेशी सरकार यामुळे जर्मन नागरिक त्रस्त होते. त्यातच १९२९ साली आलेल्या जागतिक मंदीमुळे उद्योग, व्यापार बंद पडले, बँका बुडाल्या, बेसुमार चलनवाढ झाली आणि अर्थव्यवस्था कोलमडली. या निराशाजनक परिस्थितीत १९२२ मध्ये स्थापन झालेल्या 'नॅशनल सोशॅलिस्ट' म्हणजेच नाझी पक्षाचा प्रमुख ॲडॉल्फ हिटलर याने भावना भडकवणारी भाषणे करून लोकांना आपल्याकडे आकृष्ट केले.

**हिटलरचा नाझीवाद :** 'माईन काम्फ' (माझा लढा) या हिटलरच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथातून नाझीवादाचे स्वरूप स्पष्ट होते.

**१) आत्यंतिक राष्ट्रनिष्ठा :** जगात जर्मनीला महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यासाठी जर्मन नागरिकाने कोणत्याही त्यागाची तयारी ठेवावी.

**२) वंशश्रेष्ठत्वाचा पुरस्कार :** जर्मन लोक शुद्ध नॉर्डिक (आर्य) वंशाचे असून जगातील लोकांवर सत्ता गाजविण्याचे सामर्थ्य व नैतिक अधिकार त्यांना आहेत. यासाठी जर्मन भाषिक लोक एका छत्राखाली यावेत.

**३) ज्यू-विरोध :** जर्मनीतील ज्यू लोकांच्या स्वार्थी धोरणामुळे पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला. म्हणून त्यांचा नायनाट करण्यावर नाझीवादाचा विशेष भर होता.

**४) साम्यवाद व लोकशाहीला विरोध :** साम्यवाद जर्मनीला पोषक नाही व एककेंद्री शासन देशाला उपकारक ठरते, अशी हिटलरची धारणा होती.

**५) लष्करवाद :** व्हर्साय कराराने केलेला अन्याय नष्ट करून जगात जर्मनीला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी लष्करवादाचा पुरस्कार केला.

**हिटलरच्या हाती सत्ता-** १९२९ पासून वाढलेल्या आर्थिक दुरवस्थेमुळे त्रस्त झालेल्या जर्मन लोकांना हिटलरने बळकट पक्ष संघटना स्थापून आकृष्ट केले. 'स्टॉर्म ट्रुपर्स' ही निमलष्करी तरुणांची पथके उभारली. दडपशाहीसाठी त्यांचा वापर केला. १९२८ ते १९३२ च्या दरम्यान निवडणुकांमध्ये नाझी सदस्यांची संख्या वाढत गेली. अल्पमतात असलेल्या पक्षांच्या पाठिंब्यावर बहुमताचा दावा करून हिटलरने १९३३ मध्ये चॅन्सलरपद व १९३४ मध्ये अध्यक्षपद मिळवून तो जर्मनीचा हुकूमशहा बनला. शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रसारमाध्यांचा वापर करून जर्मनीला पूर्ण नाझीमय करण्याचे धोरण आखले. 'गेस्टेपो' या गुप्तचर खात्यामार्फत सर्व विरोध क्रूरपणे दडपला. लाखो निरपराध ज्यूंची हत्या केली. त्याचबरोबर शेती व उद्योगांना चालना देऊन आर्थिक सुधारणा केल्या.

**नाझी जर्मनीचा आक्रमक पवित्रा-** जर्मन शासनावर पकड बसविल्यानंतर युरोपात आक्रमक पवित्रा घेऊन व्हर्सायचा तह झुगारून दिला. लष्कर, नौदलात वाढ केली. हवाईदल उभारले. १९३४ मध्ये राष्ट्रसंघाचे सदस्यत्व सोडून दिले. १९३५ मध्ये जबरदस्तीने सार प्रांत व ऱ्हाईनलगतचा निर्लष्करी प्रदेश ताब्यात घेतला. साम्यवादाला विरोध करून १९३७ मध्ये इटली व जपानशी करार केला. त्यामुळे लष्करवादी सत्ता एकत्र आणल्या.

**फ्रँकोची स्पेनमधील हुकूमशाही-** स्पेनमधील भ्रष्टाचारी व अकार्यक्षम राजेशाही नष्ट करून १९३१ मध्ये मवाळ सुधारणावाद्यांनी लोकशाही स्थापन केली. परंतु देशात आर्थिक व राजकीय स्थैर्य टिकविणे या शासनाला शक्य झाले नाही. १९३६ मध्ये फ्रान्सिस्को फ्रँको या लष्करी सेनानीने बंड पुकारले आणि स्पेनमध्ये यादवी युद्ध पेटले. इटली व जर्मनीने जनरल फ्रँकोला सक्रिय मदत केल्यामुळे १९३९ च्या मार्चमध्ये फ्रँको स्पेनचा हुकूमशहा बनला.

**पोर्तुगालमधील सालाझारची हुकूमशाही-** पोर्तुगालमध्ये १९१० मध्ये स्थापन झालेले गणराज्य काही लष्करी अधिकाऱ्यांनी १९२६ साली उलथून पाडले. पुढे अर्थशास्त्राचा प्राध्यापक अन्तानिओ द ऑलिव्हेरा सालाझार याने १९३२ ते १९६८ या काळात पोर्तुगालमध्ये हुकूमशाही स्थापन केली. नागरी स्वातंत्र्यावर बंधने घातली. अर्थव्यवस्था सुधारली. पण दुसऱ्या महायुद्धात तटस्थता बाळगली.

**तुर्कस्तानमधील केमाल पाशाची हुकूमशाही-** पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या विरोधात लढलेल्या तुर्कस्तानवर सेवर्सचा तह लादून त्यांचे साम्राज्य नष्ट करण्यात आले. या राष्ट्रीय अवमानामुळे सामान्य सेनाधिकारी केमाल पाशा याने बंड पुकारले. लष्कर व राष्ट्रनिष्ठ गटांच्या पाठिंब्यावर सुलताना पदच्युत करून गणराज्य स्थापन केले. लष्करी सामर्थ्याचा प्रत्यय दोस्त राष्ट्रांना आणून देऊन १९२३ मध्ये नवा करार करण्यास भाग पाडले व त्याद्वारे महत्त्वाचे प्रदेश परत मिळवले. सेनादलांवरील निर्बंध रद्द झाले. जकातींवरील परकीय नियंत्रण संपले व तुर्कस्तान सार्वभौम राष्ट्र बनले. कल्याणकारी हुकूमशहा केमाल पाशा याने आधुनिकीकरण व आर्थिक सुधारणा करून देशाची प्रगती केली. म्हणूनच तेथील जनता प्रेमाने त्याला 'अतातुर्क' (तुर्कांचा पिता) संबोधू लागली.

**स्वाध्याय :**

**प्रश्न- पुढील प्रश्नांची ४० ते ५० शब्दांत उत्तरे लिहा.**

**i) फॅसिस्ट इटली हे आक्रमक राष्ट्र कसे बनले?**

**उत्तर-** सत्तेवर येताच जनतेचे समर्थन मिळवून इटलीच्या मुसोलिनीने १९२३ पासून विस्तारवादी धोरण स्वीकारले. १) तुर्कस्तानकडून एजियन समुद्रातील बेटे मिळवून तेथे नाविक तळ उभारला. २) १९२४ साली फ्यूमचे बंदर मिळविले. ३) युरोपीय राष्ट्रे आर्थिक मंदीच्या प्रश्नात गुंतलेली पाहून आफ्रिका खंडातील इथिओपिया देशावर हल्ला केला. ४) राष्ट्रसंघाने या कृतीवर कारवाई न केल्यामुळे १९३६ साली पूर्ण इथिओपिया जिंकला. अशा प्रकारे विस्तारवादी भूमिकेमुळे इटली आक्रमक राष्ट्र बनले.

**ii) जर्मनीला पूर्ण नाझीमय करण्यासाठी हिटलरने कोणते धोरण स्वीकारले?**

**उत्तर-** जर्मनीला पूर्ण नाझीमय करण्यासाठी जर्मनीचा हुकूमशहा म्हणून हिटलरने पुढील धोरण स्वीकारले. १) तरुण जर्मन पिढीवर शैक्षणिक अभ्यासक्रमातून नाझीवाद बिंबविला. २) प्रचारमाध्यमांचा नाझीवादाच्या समर्थनासाठी वापर केला. ३) शासनात हिटलरनिष्ठांचा भरणा केला. ४) सर्व विरोधी 'गेस्टेपो' या गुप्तहेर खात्यामार्फत क्रूरपणे दडपण्यात आला. ५) लाखो ज्यू निरपराध लोकांची हत्या केली. ज्यू लोकांचे नागरी हक्क काढून घेऊन त्यांना दुय्यम नागरिक बनविले. ६) शास्त्रीय प्रगतीसाठी शास्त्रज्ञांना वेठीस धरले.

**सरावासाठी प्रश्न- २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

i) युरोपातील अनेक लोकशाही राष्ट्रे का कोलमडू लागली? ii) मुसोलिनीची उद्दिष्टे कोणती होती? iii) पहिल्या महायुद्धानंतर युरोपात असंतोष का वाढला? iv)केमाल पाशाची हुकूमशाही कल्याणकारी का ठरली? v) हिटलरने ज्यूंचा नायनाट का केला?

**उद्याचा विषय : भूमिती**

लोकसत्ता यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com